# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# माणसाच्या उदासपणाचा आरंभ




लेखक: Edward Hughes

रेखाचत्रिकार: Byron Unger; Lazarus

अनुवादक: christian-translation.com

रूपान्तरकार: M. Maillot; Tammy S.



60 गोष्टींतील 2 (पहलिी)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट वकित नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी कंवा मुद्रति करू शकता.


मराठी

Marathi








"तुम्ही
ईश्वरासारखे
होणार" इव्हला
त्या झाडाचे फळ
हवे होते. तिने
सर्पाचे ऐकले व
फळ खाल्ले.
3


ईश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन
केल्यानंतर इव्हने आदमलाही फळ
खाण्यास भाग पाडले. आदमने
सांगायला पाहिजे होते, "नाही! मी
ईश्वराची आज्ञा मोडणार नाही."
4


जेव्हा आदम आणि इव्हने पाप केले, त्यांना
दोघांनाही माहित होते की ते नग्न झाले होते. अंजीराच्या
पानांचे मलवस्त्र शिवून त्यांनी स्वतः भोवती गुंडाळले आणि
ईश्वराच्या नजरेपासून लपविण्यासाठी झुडुपात लपली.
5


शीतल संध्याकाळी ईश्वर बागेत आला. आदम आणि इव्हने
काय केले आहे याची त्याला माहिति होती. आदम
इव्हला दोष देत होता आणि इव्ह सर्पाला दोष देत
होती. ईश्वर म्हणाला, "सर्प शापीत आहेत. जेव्हा
स्त्रीला मुले होतील त्यावेळी तिला खूप वेदना
होतील." "आदम, तू चूक केल्याने पृथ्वीला
काटे आणि काटेरी झाडांचा शाप मिळाला.
तुला तुझे रोजचे अन्न मिळविण्यासाठी
काबाडकष्ट करावे लागतील,
घाम गाळावा लागेल."
6


ईश्वराने आदम आणि इव्हला त्या
सुंदर बागेतून बाहेर घालविले.
त्यांनी पाप केल्यामुळे त्यांना
जीवनदात्या ईश्वरापासून वेगळे
करण्यात आले!
7


ईश्वराने त्यांना बाहेर ठेवण्यासाठी
एक ज्योतिर्मय तलवार बनविली.
ईश्वराने आदम आणि इव्हसाठी
चामड्याचे कोट बनविले.
ईश्वराने चामडे
कोठून घेतले?
8


कालौघात, आदम आणि इव्हने एका परिवारास जन्म दिला. त्यांचा पहिला मुलगा केन एक माळी होता. त्यांचा दूसरा मुलगा आबेल मेंढपाळ होता. होता एक दिवस केनने ईश्वराला भेटवस्तू म्हणून काही भाज्या आणल्या. आबेलने ईश्वराला त्याची भेटवस्तू म्हणून त्याच्या काही उत्तम शेळ्या आणल्या. आबेलच्या भेटवस्तूने ईश्वर आनंदी झाला.
9


केनच्या भेटवस्तूने ईश्वर आनंदी झाला नव्हता. केनला खूप राग आला. पण ईश्वर म्हणाला, "जर तू जे योग्य आहे ते केलेस तर तू स्वीकारला जाणार नाहीस का?"
10


केनचा राग दूर झाला नाही. थोड्या वेळानंतर शेतात त्याने आबेलवर हल्ला केला - आणि त्याला ठार मारले.
11


ईश्वराने केनला म्हटले, "तुझा भाऊ आबेल कोठे आहे?" "मला माहित नाही", केन खोटे बोलला. "मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?" ईश्वराने केनकडून त्याची शेती करण्याची क्षमता काढून घेत आणि त्याला भटका बनवित शिक्षा केली.
12


केन प्रभूच्या अस्तित्वापासून दूर गेला. आदम आणि इव्हच्या एका मुलीशी त्याचे लग्न झाले होते. त्यांनी कुटुंब वसविले. लवकरच, केनने निर्माण केलेले शहर केनचे नातू आणि पणतू यांनी भरून गेले.
13


दरम्यान, आदम आणि इव्हच्या कुटुंबाची वेगाने वाढ झाली. त्या दिवसांत, लोक आजच्यापेक्षा जास्त काळ जगत होते.
14













माणसाच्या उदासपणाचा आरंभ

ईश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

प्राप्त झाली आहे

जेनेसिस 3-6

"आपल्या वाणीतून आल्यास प्रकाश देते."
प्लाज्म 119:130

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!